# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–१९/६/२०१२

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/६/२०१२ रोजीच्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन समितीची सभा मंगळवार दिनांक १९/६/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. सी.व्ही. ओक, जिल्हाधिकारी, मुंबई शहर** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण<br>सभापती, स्थायी समिती |
| २ | श्री शिवाजी शंकर जावळे |
| ३ | श्री रविद्र गोविंद महाजन |
| ४ | श्री उत्तम सावळेराम मोळके (पाटील) |
| ५ | श्री परमानंद किशनचंद हिंदुजा |
| ६ | श्री गोपीचंद सन्मुखदास दावानी |
| ७ | श्री संजय किसन सदावर्ते |
| ८ | श्री कुलदिपसिंग जी. मथारू |
| ९ | श्री नरेश सुगनोमल दुर्गानी |
| १० | श्री कमलेश मधुकर निकम |
| ११ | श्री भरत बळीराम खरे |
| १२ | श्री होमनारायण एस. वर्मा |
| १३ | श्री समीर सूर्यकांत भोईर |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. सी.व्ही. ओक, जिल्हाधिकारी, मुंबई शहर
२. श्री. अनिल सावंत, उप जिल्हाधिकारी
३. श्री. बालाजी खतगावकर, आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. राजेंद्र चौहान, उप–आयुक्त
६. श्री. एम.जी गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. शाम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.०० सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :–** मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ मधील नियम–४ अन्वये विशेष समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सी.व्ही. ओक , जिल्हाधिकारी, मुंबई शहर हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** परिवहन समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

**श्री. सी.व्ही. ओक (पीठासीन अधिकारी):–**

**परिवहन समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक १५/६/२०१२** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **२** नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:–

| अक्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. कमलेश मधुकर निकम | श्री. नरेंश सुगनोमल दुर्गानी | श्री. कुलदिपसिंग माथारु |
| २ | श्री. शिवाजी शंकर जावळे | श्री. उत्तम सावळाराम मोळके (पाटील) | श्री. रविंद्र गोविंद महाजन |

**परिवहन समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ नियम–०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. जावळे शिवाजी शंकर |
| २. | श्री. निकम कमलेश मधुकर |

यावेळेस दुपारी ३.०७ मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता दुपारी ३.२२ वाजले आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली नाही.

आता, परिवहन समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. जावळे शिवाजी शंकर |
| २. | श्री. निकम कमलेश मधुकर |

परिवहन समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ''होय'' म्हणुन नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम परिवहन समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. जावळे शिवाजी शंकर यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री.जावळे शिवाजी शंकर यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण<br>सभापती, स्थायी समिती |
| २ | श्री शिवाजी शंकर जावळे |
| ३ | श्री रविद्र गोविंद महाजन |
| ४ | श्री उत्तम सावळेराम मोळके (पाटील) |
| ५ | श्री परमानंद किशनचंद हिंदुजा |
| ६ | श्री गोपीचंद सन्मुखदास दावानी |
| ७ | श्री संजय किसन सदावर्ते |
| ८ | श्री होमनारायण एस. वर्मा |
| ९ | श्री. समीर सुर्यकांत भोईर |

त्यानंतर परिवहन समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्री. निकम कमलेश मधुकर यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. निकम कमलेश मधुकर यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री कुलदिपसिंग जी. मथारू |
| २ | श्री नरेश सुगनोमल दुर्गानी |
| ३ | श्री कमलेश मधुकर निकम |
| ४ | श्री भरत बळीराम खरे |

परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| निरंक | |

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

## निकाल घोषणा

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. जावळे शिवाजी शंकर | ०९ |
| २. | श्री. निकम कमलेश मधुकर | ०४ |
| एकुण मतदान संख्या – | | १३ |
| तटस्थ | | ०० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये परिवहन समिती सभापती पदाचे उमेदवार **श्री. जावळे शिवाजी शंकर** यांना **एकुण १३** मतांपैकी **०९** इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची **परिवहन समिती सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–१९/६/२०१२

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(सी.व्ही.ओक)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी

यावेळी दुपारी ३. ३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**मान्य**

(सी.व्ही.ओक)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी